**Inauguration of *Vangmay Mandal***

# नूतन मराठा महाविद्यालयात वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन

**जळगाव** | विद्यार्थ्यांत वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांचा साहित्यिक विकास व्हावा या हेतूने नूतन मराठा महाविद्यालयात मराठी विभागातर्फे वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन करण्यात आले. समन्वयक प्रा. डॉ. के. बी. पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रमुख वक्त्या म्हणून इंग्रजी विभागाच्या प्रा. डॉ. इंदिरा पाटील यांच्यासह मराठी विभाग प्रमुख प्रा.ललिता हिंगोणेकर विचारपीठावर उपस्थित होत्या. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन गौरी ठाकूर तर आभार प्रांजली बाबर या विद्यार्थिनीने मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी मराठी विभागातील प्रा. रत्नाकर कोळी, प्रा. अर्जुन पाटील, प्रा. स्वाती कोळी यांचे सहकार्य लाभले.